# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**Savitribai Phule Pune University**

*(Formerly University of Pune)*

**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७
दूरध्वनी क. (०२०) २५६२ १३९८
Website: www.unipune.ac.in

**Board of Examinations & Evaluation**
Ganeshkhind, Pune – 411 007
Telephone: (020) 2562 1398
E-mail: coe@unipune.ac.in


**संदर्भ क्र.:** परीक्षा/छावता/ 1956 **दिनांक** : १८/१२/२०२५

**तातडीचे व अत्यंत महत्वाचे**

प्रति
**मा. प्राचार्य/संचालक,**
सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
प्रस्तुत विद्यापीठ
(पुणे, अहिल्यानगर, नाशिक जिल्हा व दादरा-नगर हवेली)

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२५—२६ मधील हिवाळी २०२५ च्या परीक्षा अर्ज भरण्याच्या प्रक्रियेतील F.E. 2024 Pattern and M.E. 2025 Pattern या अभ्यासक्रमांच्या परीक्षा प्रवेश पत्रामध्ये (Hall Ticket) दुरूस्ती करणेबाबत.....**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२५—२६ मधील हिवाळी २०२५ अंतर्गत परीक्षा अर्ज भरण्याच्या प्रक्रियेतील **F.E. 2024 Pattern and M.E. 2025 Pattern** या अभ्यासक्रमांचे नियमित परीक्षा प्रवेशपत्रे (Hall Ticket) संबंधीत महाविद्यालयास/संस्थेस त्यांच्या लॉगीनमध्ये उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत.

- सदर परीक्षा प्रवेशपत्रात (Hall Ticket) काही त्रुटी, म्हणजेच आवश्यक असलेल्या विषयांचा समावेश नसणे, नावातील दुरूस्ती, अतिरिक्त/कमी विषय, Add on Credit विषयाचा समावेश नसणे इत्यादी असल्यास त्यामध्ये आवश्यक ती दुरूस्ती महाविद्यालये/संस्थेने खालील तक्त्यात नमूद केलेल्या कालावधीत करावी.

| **प्रवेशपत्रामध्ये (Hall Ticket) दुरूस्ती करण्याचा कालावधी** |
|---|
| **दिनांक १९ डिसेंबर, २०२५ सकाळी ११.०० पासून<br>ते<br>दिनांक २२ डिसेंबर, २०२५ दुपारी १२.०० पर्यंत** |

- परीक्षा प्रवेशपत्र दुरूस्तीनंतर जर अतिरिक्त परीक्षा शुल्क विद्यार्थ्यांना भरावे लागणार असेल अशा विद्यार्थ्यांना दिनांक २४/१२/२०२५ ते ३०/१२/२०२५ या कालावधीत विद्यार्थ्यांच्या परीक्षा फॉर्म लॉगिनमध्ये पेमेंट लिंक उपलब्ध करून देण्यात येईल. सदर लिंकवर विद्यार्थ्यांनी अतिरिक्त परीक्षा शुल्क भरावयाचे आहे. महाविद्यालयांनी अतिरिक्त परीक्षा शुल्क सदर विद्यार्थ्यांनी भरल्याची खात्री लेखी परीक्षा सुरू होण्यापूर्वी करावी.

विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल हे विहित मुदतीत जाहीर करण्याच्या अनुषंगाने यानंतर कोणत्याही परिस्थितीत परीक्षा प्रवेशपत्रात दुरूस्ती करण्याकरिता मुदतवाढ मिळणार नाही, याची नोंद घ्यावी.

हे पत्रक सर्वच संबंधित घटकांच्या निदर्शनास तात्काळ आणावे.

कळावे,

आपला,

**(प्रा. डॉ. प्रभाकर देसाई)**
**प्रभारी संचालक,**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**